# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## वित्त व लेखा विभाग

**परिपत्रक क्र. २६४--/२०२१**

**<u>गुणवत्ता सुधार योजनेतंर्गत महाविद्यालयांनी ऑनलाईन पद्धतीने हिशेब सादर करण्यासाठी दि. १० जानेवारी, २०२१ पर्यंत मुदत वाढ देणेबाबत...</u>**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार योजनेतंर्गत महाविद्यालय/परिसंस्थेने सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन विद्यापीठ अधिकार मंडळाने महाविद्यालयास/परिसंस्थेस चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळा आयोजन तसेच उपकरणे, क्रीडा साहित्य, बांधकाम/सौर ऊर्जा उपकरणे खरेदी याकरिता सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी अर्थसहाय्य मंजूर केलेले आहे अशा महाविद्यालय/परिसंस्थांनी अर्थसहाय्य करता ऑनलाईन पद्धतीने माहिती अपलोड करण्यासाठी परिपत्रक क्र. ३४७/२०२० नुसार दि. ३१/१२/२०२० अखेर मुदत देण्यात आली होती. परंतु अद्यापही बहुतेक महाविद्यालय/परिसंस्थांनी ऑनलाईन पध्दतीने हिशेब अपलोड केलेले नाहीत असे दिसून येत आहे.

त्यामुळे परिपत्रक क्र. ३४७/२०२० मधील अटी व नियमास अधिन राहून महाविद्यालय/परिसंस्थांनी गुणवत्ता सुधार योजनेचे हिशेब अपलोड करण्याची मुदत या परिपत्रकानुसार दि. १० जानेवारी, २०२१ पर्यंत वाढविण्यात येत आहे.

ABPatankar 31/12/20.

**सीए अतुल पाटणकर**
**वित्त व लेखा अधिकारी**

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
जा.क्र. वित्त/२०२०-२१/११६७
दिनांक : ३१ डिसेंबर, २०२०

**प्रत :- माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.**

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.
२. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त परिसंस्था, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.